# प्रकरण ४ थे : पर्यटनाचे परिणाम (Impact of Tourism)

**४.१ पर्यटनाचे आर्थिक परिणाम**
**४.२ पर्यटनाचे सामाजिक - सांस्कृतिक परिणाम**
**४.३ पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम**
**४.४ पर्यटनाचा शाश्वत किंवा सतत विकास**

---

**प्रास्ताविक:-**

भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, ऐतिहासिक घटकांचा पर्यटनाच्या विकासावरही परिणाम होतो. कोणत्याही प्रदेशातील पर्यटन केंद्राचा विकास होण्यासाठी तेथील भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असते. ज्या प्रदेशांमध्ये पर्यटनाचा विकास झालेला आहे त्या प्रदेशांमध्ये पर्यटनाचे परिणाम दिसून येतात. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय परिणाम होतात त्या सर्वांचे विवेचन या विभागांमध्ये केलेले आहे.

**४.१ पर्यटनाचे आर्थिक परिणाम** (Economic impact of Tourism)

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. अनेक राष्ट्राच्या दृष्टीने पर्यटन हा त्याच्या आर्थिक विकासाचा कणा वाटू लागला आहे. पर्यटन हा एक सेवा उद्योग आहे. यामध्ये येणाऱ्या पर्यटकांना वेगवेगळ्या टप्प्यावर विविध सेवा सुविधा द्याव्या लागतात. या सेवा उद्योगातून काही आर्थिक फायदे होतात. भारतात सुद्धा पर्यटन विकासामुळे बरेच फायदे होत आहेत ते पर्यटनाचे आर्थिक फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१.रोजगार निर्मिती**

पर्यटन व्यवसायात विविध प्रकारच्या रोजगाराची निर्मिती होते. पर्यटनामुळे कुशल व अकुशल लोकांना रोजगार मिळतो म्हणजेच पर्यटन हा रोजगाराभिमुख उद्योग आहे. पर्यटन उद्योगात रोजगाराची सुरुवात चालका पासून होते, चालक, वाहतुकीचे साधन, हॉटेल्स, खानावळी, निवासाची सोय, प्रवासी एजंट, फोटोग्राफर्स, भाजीविक्रेते, मार्गदर्शक विविध प्रकारच्या सेवा देणारे लोक यांना रोजगार मिळतो. पर्यटनामुळे पर्यटन केंद्राच्या ठिकाणी शासनाचे अनेक कार्यालय, बँका स्थापन होऊन हजारो लोकांना नोकरीची संधी उपलब्ध होते. या रोजगाराच्या निर्मितीमुळे आर्थिक प्राप्ती होऊन जीवनमान उंचावण्यास मदत होते. पर्यटन व्यावसायाचा देशाच्या सकल उत्पन्नातील वाटा अन त्यावर रोजगारासाठी आधारित लोकसंख्येचा विचार करता

पुढील आकडेवारी समोर येते. एकूण लोकसंख्येच्या 8% लोकांना पर्यटनातून रोजगार मिळतोय आणि त्यातुन राष्ट्रीय सकल उत्पन्नात 9.4% एवढी भर पडतेय, भारतातील पर्यटन वृद्धीचा अपेक्षित दर हा 6.9% राहणार आहे तसेच 2028 पर्यंत राष्ट्रीय सकल उत्पन्नातील पर्यटनाचा वाटा हा 9.9% असणार आहे. (संदर्भ: WTTO Report 2017) यावरून या उद्योगाची व्यापकता लक्षात येत.

**२.परकीय चलनामध्ये वाढ**

परकीय चलन प्राप्त करण्याचे पर्यटन हे प्रभावी माध्यम आहे. जगातील विलोभनीय पर्यटन केंद्राला पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. परदेशातून येणारे पर्यटक हे स्वतःच्या राष्ट्राचे चलन बरोबर आणतात व त्याद्वारे पर्यटन उद्योगास आवश्यक असे देवाण-घेवाण होत असते. तसेच वस्तूची अथवा इतर अत्यावश्यक किंवा पूरक सेवा प्राप्त करून घेण्यासाठी चलनाचा वियोग दुसऱ्या राष्ट्राला होतो व पर्यटन उद्योगाचा विकास होतो. कारण पर्यटकांकडून मिळणारे उत्पन्न हे सेवेतून व उपभोग्य वस्तू द्वारे होत असते. भारताच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास सण 1881 मध्ये पर्यटनाच्या माध्यमातून आपणास 1062 कोटी रुपये मिळाले होते सन 2012 मध्ये 94 हजार 487 कोटी रुपयांवर पोहोचले आहे. पर्यटनातून परकीय चलन तर मिळते शिवाय यातून रोजगारही प्राप्त होतो. परकीय चलन बदल बदलून देणाऱ्या विविध सरकारी व खाजगी संस्थातून अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो.

**३.बाजारपेठेचा विकास**

पर्यटन केंद्राच्या ठिकाणी बाजारपेठेचा विकास झालेला दिसतो. काही विशिष्ट पर्यटन केंद्राच्या सभोवताली विशिष्ट प्रकारच्या मालाची उत्पादनाची दुकाने निर्माण झालेले असतात. प्रवासी किंवा पर्यटक फावल्या वेळेत वस्तूची खरेदी करतात. यामध्ये हस्तकला व कुटीर उद्योगात निर्माण होणाऱ्या वस्तू कलाकुसरीच्या वस्तू प्रमुख असतात उदा. काश्मीर येथे शाली गालिचे, गोवा शंख-शिंपले, मैसूर चंदनाच्या वस्तू, शिमला व दार्जिलिंग शाल व स्वेटर्स, कोल्हापूर गूळ व कोल्हापुरी चप्पल, सोलापूर सोलापुरी चादर इत्यादी सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यटन बाजारपेठेत पर्यटक स्वतःहून दुकानात येतो व चटकन आहे त्या किमतीत माल खरेदी करतो त्यामुळे बाजारपेठेचा विकास व विस्तार झालेला आहे.

**४.राष्ट्रीय उत्पन्नात वाढ**

पर्यटन केंद्राला भेट देणारा पर्यटक पैशाची मोठी उधळण करत असतो या मिळणाऱ्या पैशामुळे तेथील लोकांमध्ये अनेक सुधारणा होतात लोकांचे जीवनमान उंचावते, सहाजिकच दरडोई उत्पन्न

वाढते, पर्यटन केंद्राच्या ठिकाणी निरनिराळ्या व्यवसायामधून जास्तीत जास्त उत्पन्न मिळते त्यामुळे लोकांचे दरडोई उत्पन्न वाढून राष्ट्रीय उत्पन्नामध्ये भर पडते.

**५.प्रादेशिक विकास होतो**

पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग त्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाकरिता वापरला जातो. विकसित देशात या व्यवसायातून मिळणारे उत्पन्न इतर उद्योगाच्या तुलनेने कमी असते. परंतु जे देश आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत त्या प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीने निश्चितच मदत होते. भारताची प्रादेशिक रचना भिन्न स्वरूपात आहे,भारतातील अनेक राज्य पायाभूत सुविधांपासून वंचित आहेत, भारतामध्ये भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक घटक असमान स्वरूपात दिसतात. या सर्व घटकांचा प्रदेशानुसार योग्य वापर करून प्रादेशिक असमतोल दूर करणे शक्य आहे. उदा. गोवा, हिमाचल प्रदेश, केरळ, जम्मू-काश्मीर, अंदमान निकोबार, लक्षद्वीप यांच्या पर्यटन विकासाकडे खास लक्ष दिलेले आहे. हिमाचल प्रदेश या राज्याच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाचा सहभाग 40% आहे म्हणूनच पर्यटन हे प्रादेशिक विकासाचे प्रभावी साधन ठरले आहे.

**६.पायाभूत सोयीचा विकास**

पर्यटन केंद्र म्हणून एखाद्या पर्यटन केंद्राचा विकास होऊ लागला की त्या पर्यटन केंद्राच्या ठिकाणी अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते मार्ग, रेल्वे मार्ग, हवाई अड्डे, बंदरे यांचा समावेश होतो. आधुनिक दळणवळणाच्या सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतात त्याचबरोबर त्या पर्यटनस्थळी पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा, बाग-बगीचे, हॉटेल्स, प्रसाधनगृहे, करमणूक केंद्र इत्यादी अनेक प्रकारच्या सेवा उपलब्ध करून द्याव्या लागतात. थोडक्यात पर्यटन केंद्राच्या विकासामुळेच येथील पायाभूत सुविधांचा विकास झालेला दिसून येतो. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पायाभूत सेवा सुविधांचा विकास करावा लागतो.

**७.व्यवसायाची व्याप्ती वाढते**

पर्यटन केंद्राच्या ठिकाणी व्यवसायामध्ये वाढ होते. स्वयंरोजगाराची मोठी संधी असल्याने सभोवतालच्या प्रदेशातून व आगदी देशभरातून अनेक व्यवसायिक पर्यटन केंद्राकडे येऊन आपापले व्यवसाय करतात. यातून पर्यटकांच्या गरजा भागतात खानावळी, हॉटेल्स, लॉन्ड्री, केस कर्तनालय ,मालिश , मसाज, हार गुच्छ, खेळणी, कलाकुसरीच्या वस्तू, वाहनांची दुरुस्ती करणारे, छायाचित्रकार, प्रवासी मार्गदर्शक, पुस्तक व फोटो विक्रेते, वाहनांची पार्किंग व्यवस्था व सुरक्षितता पाहणारे, वाटाडे, पादत्राणे दुरुस्ती इत्यादी अनेक

व्यवसायिक आपापले व्यवसाय याठिकाणी करतात त्यातूनच पर्यटन केंद्राच्या ठिकाणी व्यवसायाची व्याप्ती वाढत असलेली दिसून येते उदा. पन्हाळा या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी माफक दरामध्ये झुणका-भाकर मिळतो त्यामुळे पर्यटक आनंदाने त्या ठिकाणी त्या अन्नाचा आस्वाद घेतात

**८.दळणवळण सेवा सुविधाचा विकास**

पर्यटन हा असा उद्योग आहे की तो वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून आहे. त्यामुळे एखाद्या पर्यटन स्थळाचा विकास करावयाचा म्हटले तर त्याची सुरुवात रस्त्यापासून होते, जर रस्ते व्यवस्थित नसतील तर पर्यटक तिकडे फारसे जात नाहीत. प्रवासाची सोय अधिक चांगली करणे हा पर्यटन विकासाचा महत्त्वाचा भाग आहे या वाहतूक व्यवस्थेतील सुधारणेचा फायदा केवळ पर्यटकांनाच होतो असा भाग नाही, त्या ठिकाणी असणारे व्यवसाय, व्यापार, उद्योगधंदे यांच्या वाढीस सुद्धा फायदा होतो उदा. हिमाचल प्रदेशात पर्यटन व्यवसायामुळे हवाई वाहतुकीला उत्तेजन मिळाले आहे.

**९.देशाच्या महसुलावर परिणाम होतो**

पर्यटन केंद्राला भेटी देण्यासाठी दररोज लाखो पर्यटक येत असतात. देशांतर्गत पर्यटक जसे येतात तसेच परदेशी पर्यटक येतात. देशाला या परदेशी पर्यटकाला पासून मोठा फायदा मिळतो त्यांच्यापासून त्यांच्या देशाचे चलन प्राप्त होते हे चलन पुढे आंतरराष्ट्रीय व्यापार यासाठी वापरले जाते. देशाला परदेशी चलन जेवढे जास्त मिळते तितका देश आर्थिकदृष्ट्या समर्थ होतो. परदेशी पर्यटक प्रचंड प्रमाणात परदेशी चलन मिळवून देतात एकंदरीत पर्यटनातून देशाच्या महसूलमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ होते

**१०.दरडोई उत्पन्नामध्ये वाढ**

पर्यटन केंद्राला भेट देणारा पर्यटक पैशाची मोठी उधळण करत असतो. तो मौजमजा, मनोरंजन, आत्मसुख, शांती इत्यादीसाठी पर्यटनासाठी आलेला असतो. तो मुक्तहस्ते पैशाची उधळण करीत असतो त्यामुळे जेवढे पर्यटक पर्यटन स्थळी जास्त येतात तेवढे तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढते त्यामुळेच येथील लोकांचाही विकास झालेल्या दिसून येतो.

**११.औद्योगीकरण परिणाम**

पर्यटन केंद्राच्या सभोवतालच्या प्रदेशातील औद्योगीकरणाचा परिणाम पर्यटन केंद्रावर होतो. पर्यटन केंद्राच्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांच्या आवडीनुसार लहान-मोठ्या कारखान्याची निर्मिती या

प्रदेशामध्ये होते. त्यामध्ये नक्षीकाम, वस्तू तयार करणारे, काच वस्तू, सौंदर्यप्रसाधने, खाद्यांने तयार करणारे, कारखाने स्थापन होऊन पर्यटन केंद्राच्या सभोवताली लहान-मोठे उद्योगधंद्याच्या विकास झालेला दिसून येतो.

**१२.लोकांच्या आर्थिक क्षमतेत वाढ होते**

पर्यटन व्यवसायाच्या विकासाबरोबरच लोकांच्या आर्थिक क्षमतेचा विकास होतो. स्थानिकांना रोजगार मिळून  दरडोई उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम होतो.

**१३.साधनसंपत्तीचा विकास होतो**

पर्यटन व्यवसायाचा हा सर्वात मोठा परिणाम पाहावयास मिळतो. स्थानिक साधन संपत्ती आतापर्यंत अगदी मर्यादित स्वरूपात वापरली जात असे ती दुर्लक्षित होती पर्यटनामुळे वापरात येऊन तेथील प्रदेशाचा विकास झालेला दिसून येतो.

**१४. लघु व हस्त उद्योगाच्या विकासाला चालना मिळते**

पर्यटन केंद्राच्या ठिकाणी येणारा पर्यटक हा फक्त फिरणे या उद्देशाने येत नाही तर पर्यटन केंद्राच्या ठिकाणी ज्या प्रसिद्ध वस्तू आहेत त्या खरेदी करतो त्यामुळे त्या प्रदेशातील लघु , हस्तकला व कुटिर उद्योगाचा विकास झालेला दिसून येतो उदा. काच वस्तू ,बांबूच्या वस्तू, चामड्याच्या वस्तू, सौंदर्यप्रसाधने, खाद्यपदार्थ, लाकडी वस्तू, कपड्या वरील नक्षीकाम, लाकडावरील नक्षीकाम इत्यादी.

**४.२ पर्यटनाचे सामाजिक व सांस्कृतिक परिणाम** (Socio-Cultural impact of Tourism)

सामाजिक परिस्थितीशी पर्यटनाचा जवळचा संबंध असतो. पर्यटनाचे सामाजिक जीवनावर बरेवाईट परिणाम होत असतात. पर्यटक हे देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले असतात त्यामुळे त्यांच्या भागातील वेगवेगळया जीवन पद्धती, चालीरिती, भाषा, वागणे इत्यादीचा नाही म्हटले तर स्थानिक समाजावर प्रभाव पडतो. परदेशातून येणारे पर्यटक तर सर्वच बाबतीत भिन्न असतात त्यांचा ही सामाजिक जीवनावर परिणाम होतो. पर्यटनामुळे सामाजिक व सांस्कृतिक बदलाची प्रक्रिया सुरू होते. या बदलाचा वेग मंद असतो. त्यातील काही ठळक परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील

**१.सामाजिक परिवर्तन घडते**

पर्यटनाचा हा सर्वात मोठा सामाजिक परिणाम दिसून येतो. पर्यटनाच्या निमित्ताने देशाच्या व जगाच्या वेगवेगळया भागातून वेगवेगळया धर्माचे, पंथाचे, जातीचे लोक येतात त्या प्रत्येकाचे सामाजिक आचरण भिन्न प्रकारचे असते. सुधारलेले लोक आले की त्यांच्याबरोबर विविध सुधारित विचारप्रवाह

येऊ लागतात व त्यांचा परिणाम असा होतो की स्थानिक लोकांच्या जगण्यात बदल होतो जुने विचार मागे पडून नव्या विचारांची निर्मिती होऊन सामाजिक परिवर्तन घडून येते.

**२.सामाजिक ऐक्य निर्माण होते**

पर्यटन केंद्राला भेट देणारा पर्यटक धर्म, पंत, समाज विसरून एकत्र पर्यटनाचा आनंद लुटत असतो. पर्यटन केंद्राच्या ठिकाणी एकमेका सहाय्य करू अशा भावनेने पर्यटक वागतात. एखादा पर्यटक अडचणीत सापडला तर बाकीचे अनोळखी पर्यटक सुद्धा मदतीला धावतात यातूनच सामाजिक ऐक्याची भावना वाढीस लागते.

**३.देशाची एकात्मता वाढीस लागते**

पर्यटनातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते कारण पर्यटन केंद्राच्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रांतातील लोक एकत्र येतात त्यांची भाषा, त्यांचा धर्म, त्यांची जात वेगळी असते परंतु पर्यटन केंद्राच्या ठिकाणी एक मानव जात म्हणून हे लोक एकमेकाशी वर्तन करतात. आपापल्या प्रांताची वैशिटे सांगून आपण सर्व एकाच देशाचे नागरिक आहोत हे दाखवून देतात. एका विशिष्ट सांस्कृतिक कार्यक्रमात सर्व जण सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवितात यातून देशाच्या एकात्मतेची भावना वाढीस लागते.

**४.सांस्कृतिक विकास घडून येतो**

पर्यटन ठिकाणांकडे जर पाश्चिमात्त्य देशाचे पर्यटक आले तर त्याठिकाणी मागासलेल्या विचाराचे पर्यटक सुधारलेल्या विचाराकडे आकर्षित होतात त्यामुळेच पर्यटकांमध्ये सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढीस लागून सांस्कृतिक विकास घडून येतो.

**५.शैक्षणिक विकास होतो**

बरेचसे पर्यटक सुशिक्षित व उच्च आर्थिक गटातील असतात त्यांचा स्थानिक लोकांवर प्रभाव पडतो. पर्यटकांच्या सहवासामुळे स्थानिक लोकांना शिक्षणाबद्दल आवड निर्माण होते यातूनच स्थानिकांचा शैक्षणिक विकास घडून येतो

**६.धार्मिक पर्यटन स्थळाचा विकास होतो**

धार्मिक पर्यटन हे पर्यटनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. अनेक पर्यटक धार्मिक स्थळांना भेटी देतात. या धार्मिक स्थळी धर्माची शिकवण देणारी भजने, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम होतात. यातून

सहिष्णुता शिकवली जाते. सर्व भाविक पर्यटक एकत्र येऊन धार्मिक उसावात सहभागी होतात त्यामुळेच धार्मिक स्थळाचा विकास होतो

**७.लोकांच्या प्रवृत्तीत बदल होतो**

पर्यटन व्यवसायाच्या अनेक टप्प्यावर रोजगार निर्मिती होत असल्याने लोकांना अनेक व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतात. कमी श्रमात जास्त पैसा मिळवून देणारे पर्यटन केंद्रातील अनेक व्यवसाय सभोवतालच्या शेती करणाऱ्या लोकांना आकर्षित करू लागतात याचा परिणाम प्राथमिक व्यवसायातील मनुष्यबळ पर्यटन केंद्र जवळ व्यवसायाकडे वळले जातात. सहाजिकच हा बदल लोकांच्या प्रवृत्तीत झालेला दिसून येतो

**८.सामाजिक संघर्ष निर्माण होतात**

पर्यटनामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. पर्यटक एका वयोगटाचे नसतात यामध्ये तरुण, हौशी पर्यटकांची संख्या जास्त असते. काही पर्यटक तर केवळ मौजमजा, दंगा करण्यासाठीच पर्यटन स्थळी येत असतात. इतर पर्यटकांची टिंगल करणे, मुलीची छेड काढणे, उघड्यावर नाचणे, मोठ्या आवाजात गाणी वाजवणे, मद्यपान करणे, स्थानिकांना त्रास देणे इत्यादी गोष्टीतून सामाजिक शांतता भंग पावते त्यामुळे पर्यटक आणि स्थानिक लोक यांच्यात संघर्ष निर्माण होतात.

**९.गुन्हेगारी वाढीस लागते**

पर्यटन केंद्राच्या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो पर्यटक येतात त्यांना पर्यटन केंद्राची फारशी माहिती नसते त्यांचा गैरफायदा घेऊन काही गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना लुटण्याचा प्रयत्न करतात काही वेळा हे गुंड लोक तरुणीवर अत्याचार करतात. चोऱ्या, दंगल, मध्यपान, जुगार इत्यादी अवैद्य प्रवृत्तीमुळे पर्यटन केंद्र जवळ गुन्हेगारी वाढत आहे.

**१०.वसाहती निर्माण होतात**

पर्यटनाचा एक दृश्य परिणाम म्हणजे नवीन मानवी वस्त्यांची निर्मिती होय. भारतामध्ये ब्रिटिश काळात अनेक पर्यटन स्थळांचा विशेषता थंड हवेच्या ठिकाणांचा या दृष्टीने विकास झालेला आहे उदा. डेहराडून, शिमला, दार्जिलिंग, मसूरी, महाबळेश्वर, पाचगणी, लोणावळा इत्यादी.

**११.राहणीमानामध्ये परिवर्तन घडून येते**

पर्यटकांमुळे पर्यटन क्षेत्रातील लोकांच्या जीवन पद्धतीमध्ये परिवर्तन घडून येते. पर्यटकांचे राहणीमान, त्यांची जीवनपद्धती, संस्कृती त्याचे स्थानिक लोकांशी संबंध, यांचा स्थानिक लोकांवर बराच प्रभाव पडून त्यांच्या राहणीमानात मध्ये परिवर्तन घडून येते.

**१२.शेतकऱ्यांचा विकास**

पर्यटनामुळे ग्रामीण भागातील लोकांना बऱ्याच सोयी उपलब्ध होतात. पर्यटनामुळे निर्माण होणारे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विमानतळ, इमारती, रस्ते, आरोग्यधाम इत्यादीचा फायदा तेथील शेतकरी वर्गास निश्चित होतो. मोठ्या जमीनदारांना वरील निरनिराळ्या कारणासाठी शेतीक्षेत्र विकल्यामुळे त्याचाआर्थिक फायदा होतो.

**१३.आंतरराष्ट्रीय सामंजस्य व ऐक्य वाढीस लागते**

पर्यटनामुळे राष्ट्रा राष्ट्रातील मतभेद, वाद, समस्या सुटून आंतरराष्ट्रीय सामंजस्य व ऐक्य वाढीस लागते. यामुळे केवळ राष्ट्रातील परस्पर मतभेद दूर होतात असे नव्हे तर परस्परांची संस्कृती व सामाजिक शैक्षणिक देवाणघेवाण सुरू होते, व्यापार वाढतो, जागतिक युद्ध, अन्नवस्त्र, पर्यावरणाचे प्रश्न यामुळे मार्गी लागतात. त्यामुळेच पर्यटन हा एक भविष्यातील आंतरराष्ट्रीय सामंजस्य व ऐक्य घडवून आणणारा घटक बनलेला आहे.

अशाप्रकारे एखाद्या पर्यटन स्थळ विकसित झाले की त्या ठिकाणी संथ गतीने सामाजिक व सांस्कृतिक चांगले व वाईट परिणाम झालेले दिसून येतात.

**४.३ पर्यटनाचे पर्यावरणीय घटकांवरील परिणाम** (Impact on Environment of Tourism)

मानवाच्या सभोवतालच्या परिस्थितीला पर्यावरण असे म्हणतात. जमीन, हवा, पाणी, वनस्पती, प्राणी, सौरशक्ती इत्यादी गोष्टी पर्यावरणाचे घटक आहेत. मानव हा सुद्धा पर्यावरणाचा एक घटक असतो. वरील घटकाचा मानवाच्या संपूर्ण जीवनावर चांगला व वाईट परिणाम होत असतो. पर्यावरणानुसारच मानवाची जीवनपद्धती ठरत असते. पर्यटन हा मानवी व्यवसाय असल्याने या पर्यटन व्यवसायावर सभोवतालच्या पर्यावरणाचा परिणाम होतो पण पर्यटनाचाही पर्यावरणावर परिणाम होत असतो. पर्यावरणाच्या विविध घटकांवर पर्यटनाचा परिणाम होतो तो पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**१.पर्यटन व नैसर्गिक वनस्पती**

नैसर्गिक वनस्पती हा एक पर्यटन विकासातील महत्त्वाचा नैसर्गिक घटक आहे. या घटकामुळे नैसर्गिक सृष्टीसौंदर्यात मोलाची भर पडते. पशुपक्ष्यांना आसरा व अन्न मिळते अशा या घटकावर पर्यटनाचा जो परिणाम होतो तो पुढीलप्रमाणे

I. पर्यटक जी फळे, फुले गोळा करतात त्यामुळे त्या विभागातील नैसर्गिक वनस्पती च्या स्वरुपात बदल घडून येतात

II.पर्यटक राष्ट्रीय उद्याने, जंगले व गवताळ कुरणात जी आग लावतात त्यामुळे झाडे, वेली, गवत यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते

III.पर्यटक बऱ्याच वेळा तंबू साठी व शेकोटी साठी झाडांची तोड करतात

IV. पर्यटकांकडून जंगलात कचरा टाकून दिल्यामुळे तेथील वातावरण दूषित होते

V.मनोरंजन, हॉटेल, रस्ते इत्यादीमुळे जंगल व्याप्त गवताळ प्रदेशात झपाट्याने घट होत आहे

VI.जंगलातील वन्य पशुपक्षी यांच्या सवयी पर्यटकांमुळे बदलू लागतात उदा. पर्यटक पशुपक्ष्यांना जे खाण्याचे पदार्थ टाकतात त्यामुळे त्यांच्या सवयी बदलतात काही वेळा त्यांना निरनिराळे आजार होतात

VII.काही पर्यटक पशुपक्ष्यांची शिकार करतात त्यामुळे प्राण्यांच्या संख्येमध्ये घट होत आहे

VIII. पर्यटनाच्या विकासासाठी राष्ट्रीय उद्याने, राखीव जंगले, इत्यादी साठी लागणारे क्षेत्र सभोवतालची शेती क्षेत्रातून घेतले जाते. परंतु शेतकरी नंतर लोकसंख्या वाढल्यावर या सुरक्षित भागात आक्रमण करतात त्यामुळे या सुरक्षित भागात वन पशुपक्ष्यांना वावरता येत नाही.

IX.पर्यटक फोटो घेतात, मोठमोठ्याने गाणी लावतात त्या आवाजामुळे पशुपक्ष्यांच्या निर्मितीच्या कार्यावर प्रतिकूल परिणाम होतो

**२.पर्यटन व पर्यावरणाचे प्रदूषण**

पर्यटनाच्या विकासामुळे पर्यावरण प्रदूषित एक जागतिक गंभीर समस्या बनलेली आहे. ते प्रदूषण पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल

**I.बीचेस चे प्रदूषण**

गेल्या काही वर्षांमध्ये बीचेस हे प्रगत राष्ट्रातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. पर्यटक अमेरिकेतील मियामी, कॅरेबियन बेटे व भूमध्यसागरी किनारा, उष्णकटिबंधातील सागरी बेटे उदाहरणार्थ मॉरिशस

मालदीव इत्यादी. भारतातील गोवा व इतर सागर किनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी भरपूर आहे. त्याचबरोबर देशांतर्गत पर्यटक ही वाढू लागले आहेत. या पर्यटकांनी टाकून दिलेल्या विविध वस्तू व पेय, प्लॅस्टिक कागद त्यांचा कचऱ्याचे ढीग बीचेस वर वाढू लागलेले आहेत. पर्यटकांच्या सातत्याच्या वावरामुळे कासवासारखे प्राण्यांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ लागलेला आहे.

**II.जल प्रदूषण**

पर्यटनाच्या विकासामुळे पाण्याचे प्रदूषण वाढत चालले आहे. पर्यटकांचे तंबू, सांडपाण्याची विल्हेवाट यामुळेही जल प्रदूषण वाढत चालले आहे. पर्यटन ठिकाणे शक्यतो तळी, तलाव, नद्या, सरोवरे यांच्या सानिध्यात उभारली जातात, सांडपाणी अशा जलाशयात मिसळत राहिल्यामुळे हे जलाशय पर्यटकांमुळे झपाट्याने प्रदूषण होत आहेत. पर्यटकांनी टाकून दिलेल्या वस्तू पाण्यात मिसळून जलप्रदूषण होण्यास हातभार लागतो. पर्यटकांचे मलमूत्र विसर्जन हेसुद्धा याचे मुख्य कारण आहे. महाबळेश्वरच्या वेण्णा तलावाच्या प्रदूषणाचे प्रमुख कारण पर्यटन हे आहे.

**III.ध्वनि प्रदूषण**

वास्तविक नागरी वस्तीपासून दूर शांत वनाच्या सानिध्यात पशुपक्ष्यांच्या सहवासात काही काळ आरामात घालावा ही पर्यटनाची मूळ प्रेरणा आहे. शहराच्या गोंधळ, गोंगाटापासून दूर जावे असे प्रत्येकाला वाटते यातूनच पर्यटनस्थळाचा विकास झाला परंतु हीच पर्यटनस्थळे आज गोंगाट युक्त बनलेले आहेत. या गोंगाट यातून केवळ पर्यटकच नव्हे तर जंगलातील पशू-पक्षी सुटलेली नाहीत. पर्यटकांच्या वाहनांचा आवाज, रेडिओ, टेपरेकॉर्डर यांचा गोंधळ, मोठ्या आवाजात म्हटलेली गाणी यामुळे ही पर्यटन केंद्रे गोंगाट व गर्दीच्या ठिकाणी झालेली आहेत. जंगलव्याप्त भागात अशा आवाजाचा तेथील पशुपक्ष्यांवर विपरीत परिणाम होतो त्यांची प्रजनन क्षमता कमी होते.

**३.पर्यटन व पशुपक्षी**

वन्य पशुपक्षी हा पर्यावरणाचा एक महत्त्वाचा घटक असून पर्यटन विकासात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतातील जिम कार्बेट नेशनल पार्क, काझीरंगा अभयारण्य, भरतपूरचे पक्षी अभयारण्य असे कित्येक राष्ट्रीय उद्यानांना पर्यटक दरवर्षी लाखोंच्या संख्येने भेट देतात व पशुपक्षी यांच्या सानिध्यात रोमहर्षक अनुभव घेतात. परंतु तेथील पशु पक्षांच्या दृष्टीने ज्या गंभीर समस्या निर्माण होतात याचा विचार केला पाहिजे पर्यटकाच्या अतिरिक्त संख्येमुळे अभयारण्याचे शांत वातावरण बिघडते, सातत्याने होणाऱ्या आवाजामुळे पशुपक्ष्यांचे स्वास्थ

खराब होते त्याचा परिणाम त्याच्या आरोग्यावर इतर सवयीवर व पुनर्निर्मिती होतो. गीर अभयारण्यातील सिहाच्या संख्येमध्ये वाढ न होणे हे याचे उदाहरण आहे.

अशा रितीने पर्यटनाचा पर्यावरणीय घटकावर संथ परिणाम दिसून येतो त्याचे परिणाम मात्र दूरगामी झालेले दिसून येतात.

**४.४ पर्यटनाचा शाश्वत विकास** (Sustainable development of Tourism)

जगामध्ये आज पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय बनलेला आहे. हजारो पर्यटक भारतात पर्यटन ठिकाणांना भेटी देत असतात. या पर्यटकांमुळे पर्यावरणाचाही ऱ्हास होत आहे. हा पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून पर्यटन भूगोलात पर्यटनाचा शाश्वत विकास ही संकल्पना अभ्यासली जात आहे.

शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करताना आपल्या पुढील पिढ्यांच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न येऊ देता साध्य केलेला विकास होय. शाश्वत विकास म्हणजे पृथ्वीवरील संसाधनांचा उपयोग करून आपला विकास करताना पुढील पिढ्यांच्या विकासासाठी संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे होय. शाश्वत विकास या शब्दात नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनांचा जपून आणि योग्य तितका वापर करणे अपेक्षित आहे. जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक संसाधने आज मोठ्या प्रमाणात आणि अनियंत्रितपणे वापरली जात आहेत. आपल्या येणाऱ्या पिढ्यांचा विचार करून जी मर्यादित संसाधने आहेत त्यांचा नियंत्रित वापर शाश्वत विकासात अपेक्षित आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या नवीकरणक्षम ऊर्जास्रोतांचा जास्तीत जास्त वापर शाश्वत विकासाचा पाया आहे. अनियंत्रित इंधनउपसा, जंगलतोड, अनिर्बंध जलउपसा आणि वापर, औद्योगिकीकरण आणि लोकसंख्यावाढ, प्रदूषण या सर्वांमुळे शाश्वत विकासाला बाधा निर्माण होते. शाश्वत विकासात माणसांबरोबरच पृथ्वीवरील इतर जीवसृष्टीचाही विचार केला जातो. माणूस हा पृथ्वीवरील एका साखळीचा भाग आहे, त्या साखळीच्या मर्यादा लक्षात घेऊनच त्याची वागणूक असली पाहिजे हा याचा मुख्य उद्देश आहे.

शाश्वत पर्यटन म्हणजे वर्तमान व भावी पिढीला स्वच्छ व सुंदर प्रदूषित न होता पर्यटन स्थळ राखून ठेवणे. शाश्वत पर्यटन करताना पर्यावरणामध्ये होणारा त्रास लक्षात घेऊन नवनवीन योजना चा वापर करून पर्यटन स्थळे प्रदूषित होण्यापासून वाचवली जातात. महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना देत असतानाच पर्यावरण संरक्षण ही व्हावे यासाठी जागतिक पर्यटन दिनानिमित्त, महाराष्ट्र पर्यटन मंडळ आणि शाश्वत पर्यटनाच्यादृष्टीने दिशेने वाटचाल सुरू केली आहे. मंडळाच्या काही रिसॉर्टवर आता रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प

तर काही ठिकाणी बायो डिजास्टर (टॉयलेट) बसवण्याचे काम सुरू आहे. जागतिक पर्यटन संस्थेने या वर्षी टुरिझम एनर्जी पॉवरिंग सस्टेनेबल डेव्हलपमेंट या संकल्पना निश्चित केलेले आहे. यानुसार जगभरातील पर्यटन मंडळ आणि शाश्वत ऊर्जा आणि पर्यटनाला चालना द्यावी असे आवाहन संस्थेने केले आहे. महाराष्ट्र पर्यटन मंडळांनीही याची दखल घेतली असून आगामी वर्षात राज्यातील विविध रिसॉर्टवर पर्यावरण पूरक सुविधा सुरू केल्या जाणार आहेत. रिसॉर्टच्या भौगोलिक रचनेनुसार काही ठिकाणी सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून यासाठी (मेढा) सहकार्य करणार आहे. बायो टॉयलेटला आम्ही विशेष प्राधान्य देत असून सध्या अक्कलकोट आणि धारागिरी च्या लेण्या जवळील रिसॉर्ट मध्ये या प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. याशिवाय ज्या भागात पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात जाणवतो अशा रिसॉर्टच्या जागेत रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारण्याचे नियोजन केले जात आहे. शाश्वत पर्यटनाविषयी जागृती करण्यासाठी मंडळाने ग्रिनी द ग्रेट हे नवीन कार्टून विकसित केले असून मंडळाचा ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून ग्रिनी काम करणार आहे. ग्रिनीचा सहभाग असलेले रिस्पॉन्सिबल टुरिझमचे धडे देणारे लघुपटही तयार करण्यात आले आहेत. मंडळाच्या वेबसाईटवर हे लघुपट प्रदर्शित केले आहेत.

थोडक्यात पर्यटन स्थळे भविष्यात वाचवण्यासाठी शाश्वत विकासाकडे डोळे उघडे ठेवून बघणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळाचे संवर्धन करण्यासाठी पुढील ठळक वैशिष्ट्याकडे लक्ष द्यावे लागेल.

**ठळक वैशिष्ट्ये**

१.पर्यटकांनी कोठेही गेल्यानंतर आपण केलेला कचरा कचरापेटीत टाकावा

२.ऐतिहासिक पर्यटन स्थळी गेल्यानंतर आपण तेथे आपल्या नावे कुणी पराक्रमी पुरुष किंवा स्त्री असल्याप्रमाणे नावे कोरण्याचा मोह टाळावा

३. पर्यावरण स्नेही वाहतूक साधनाचा वापर करावा जसे आग्रा येथे विजेवर चालणाऱ्या रिक्षा

४.तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी लोकांनी अस्वच्छता टाळावी

५.जिथे आपण पर्यटनाला जातो तेथील संस्कृतीची चेष्टा करू नये

६.पर्यटनस्थळी अपारंपारिक ऊर्जास्रोतांचा वापर करावा

७. शाश्वत पर्यटना मधून किल्ल्याचे संवर्धन करावे

८. पर्यटन स्थळाचा शाश्वत विकास करण्यासाठी सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्प करावेत

९. पर्यटनस्थळी बायो टॉयलेट प्रकल्प उभा करावेत

जगामध्ये पर्यटन हा एक आर्थिक उद्योग बनला असला तरीसुद्धा वाढती लोकसंख्या आणि वाढते पर्यटक लक्षात घेऊन भविष्यामध्ये जे काही पर्यटन स्थळे आहेत त्या पर्यटन स्थळे प्रदूषीत होण्याची शक्यता आहे. तरी पर्यटन स्थळाचे संवर्धन व जतन करण्यासाठी, भावी पिढीस पर्यटन स्थळ दाखविण्यासाठी पर्यटनाचा शाश्वत विकास करणे गरजेचे आहे.

---

## स्वाध्याय

खालील प्रश्नासाठी योग्य पर्याय निवडा

१.वर्तमान व भावी पिढीचा विचार कोणत्या पर्यटन प्रकारात केला जातो

अ) ऐतिहासिक पर्यटन ब) शाश्वत पर्यटन क) धार्मिक पर्यटन ड) यापैकी नाही

२.जागतिक पर्यटन दिन कधी साजरा केला जातो

अ) 27 सप्टेंबर ब) 12 सप्टेंबर क) 15 मे ड) यापैकी नाही

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा

१.पर्यटनाचा शाश्वत विकास

२.पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम

खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

१.पर्यटनाचा आर्थिक परिणाम सांगा

२.पर्यटनाचा सामाजिक व सांस्कृतिक परिणाम स्पष्ट करा

३. पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम विशद करा

---

### संदर्भ ग्रंथ सूची


१. डॉ.शिंदे एस. बी.(२००६): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. डॉ. शिंदे सुनिता शंकरराव (२०१३): पर्यटन भूगोल, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद

३. डॉ. घारपुरे विठ्ठल (२००१): पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

४. खतीब के. ए (२००६): पर्यटन भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

५.प्रकाश सावंत: भारताचा भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६. प्रा. अ.वि. भागवत (१९९८): पर्यटन भूगोल, अश्वमेध प्रकाशन, पुणे

७. दूरशिक्षण केंद्र (२००९): पर्यटन भूगोल, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर